महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक – ५७२/१६ दिनांक :- १० फेब्रुवारी, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# नवव्या म्हाडा लोकशाही दिनात पाच प्रकरणांवर तात्काळ 'निकाल'

## 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या गतिमान निर्णयाने अर्जदारांना दिलासा

मुंबई, दि. १० फेब्रुवारी, २०२५ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) आज आयोजित नवव्या लोकशाही दिनात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से) यांनी आज पाच अर्जदारांच्या तक्रारीवर सुनावणी देत संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आणि पाचही प्रकरणांचा आजच्या आज 'निकाल' लावला.

श्री. जयस्वाल यांच्या वेगवान निर्णयक्षमतेमुळे अर्जदारांना कोणत्याही विलंबाशिवाय न्याय मिळाला. लोकशाही दिनात हजर असलेल्या अर्जदारांनी आपल्या समस्या तात्काळ सोडवण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त करत म्हाडा प्रशासनाचे आणि श्री. जयस्वाल यांचे आभार मानले.

म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात आयोजित लोकशाही दिनात उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांनी अर्जदार श्री. अमृत कोरे यांच्या सन २००४ मध्ये खरेदी केलेल्या कांदिवली पश्चिम येथील म्हाडा सदनिकेच्या नियमितीकरणाबाबतच्या अर्जावर सुनावणी घेतली. संबंधित अर्जदार यांना दुपारी ०३.०० वाजेपर्यंत सदनिका हस्तांतरणाचे निर्देश संबंधित मिळकत व्यवस्थापक यांना दिले. संबंधित मिळकत व्यवस्थापक यांनी तात्काळ निर्देशांचे पालन करीत संबंधित अर्जदार यांना सदनिका नियमित करण्याबाबतचे पत्र आजच सुपूर्द केले. अशाप्रकारे अनेक वर्षांपासून प्रलंबित राहिलेल्या अर्जावर श्री जयस्वाल यांनी तात्काळ निर्णय मिळवून दिला.

मुंबई दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील मुंबई सेंट्रल येथील पुनर्रचित सदनिका श्री. फित्जोराल्ड ओजारीओ यांच्या नावे हस्तांतरित करण्याबाबत अर्ज केला होता. सदर सदनिका ही फित्जोराल्ड ओजारीओ यांच्या आईच्या नावे होती. आईच्या निधनानंतर त्यांच्या दोन मुलांपैकी एका मुलाच्या नावे सदनिका हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच त्या मुलाचे निधन झाले. अशाप्रकारे हयात असलेल्या मुलाच्या नावे म्हणजे श्री. फित्जोराल्ड ओजारीओ यांच्या नावे सदनिका हस्तांतरण करण्याची मागणी आजच्या लोकशाही दिनात करण्यात आली. मात्र, वारसा हक्क प्रमाणपत्र नसल्याने त्यांच्या नावे सदनिका हस्तांतरण होत नव्हते. उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांनी अर्जदाराने दिलेले क्षतिपूर्ति बंधपत्र (Indemnity Bond) ग्राह्य धरण्याच्या सूचना करून संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सदनिका श्री. फित्जोराल्ड ओजारीओ यांच्या नावे करण्याचे निर्देश दिले. संबंधित अर्जदार यांच्या नावे सदनिका हस्तांतरित झाल्याचे पत्रही आजच अर्जदार यांना देण्यात आले.

तसेच कोकण मंडळाच्या सोडतीत २० टक्के सर्वसमावेशक योजनेत विजेते ठरलेल्या श्री. मोहम्मद खान यांना पार्किंग व क्लब हाऊसची सुविधा नको असताना विकासकाने प्रोसेसिंग फीसह वाढीव शुल्क आकारले आहे. संबंधित विकासकाला श्री. जयस्वाल यांनी तात्काळ दूरध्वनी करून सदर आकारलेले वाढीव शुल्क कमी करण्याचे निर्देश दिले. यामुळे अर्जदार यांना दिलासा मिळाला आहे.

चारकोप कांदिवली (पश्चिम) येथील भाग्योदय सहकारी गृहनिर्माण संस्थेत भावाच्या नावे असलेली सदनिका सन २०१६ मध्ये भावाने बक्षीस पत्र करून श्री. अनिल प्रभूलकर यांच्या नावे करून दिली. मात्र नोंदणीकृत बक्षीसपत्र नसल्यामुळे सदनिका श्री. प्रभूलकर यांच्या नावे नियमित होत नसल्याचे प्रकरण प्रलंबित होते. याप्रकरणी लोकशाही दिनात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी सदर सदनिका आजच्या आज श्री. अनिल प्रभूलकर नियमतीकरण करण्याचे निर्देश दिल्यानंतर आजच संबंधित अधिकाऱ्यांनी सदनिका नियमित केल्याचे पत्र अर्जदारांना सादर केले.

न्यू डी एन नगर शिवनेरी सहकारी गृहनिर्माण संस्थेने तात्काळ पुनर्रचित इमारतीतील सदनिकेचा ताबा मूळ रहिवासी श्री. दिलीप सूर्यवंशी यांना देण्यासाठी संबंधित उपनिबंधक यांनी तात्काळ आदेश पारित करून प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार उपनिबंधक यांनी आजच श्री. संजय वाळंज यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करून त्यांना या प्रकरणी ०७ दिवसांच्या आत कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

लोकशाही दिनात आपल्या प्रलंबित प्रकरणांचा तात्काळ निपटारा झाल्याने श्री. कोरे, श्री. ओजारीओ, श्री. खान, श्री. प्रभूलकर, श्री. सूर्यवंशी यांनी श्री. जयस्वाल यांचे व म्हाडा प्रशासनाचे विशेष आभार मानले.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील नवी चिखलवाडी, म्हाडा कॉलनी, इमारत क्रमांक १० या पुनर्रचित इमारतीची देखभाल म्हाडाने करण्याचा अर्ज श्री. दीपक राणे यांनी लोकशाही दिनात केला. या प्रकरणी संबंधित इमारतीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने (नियोजित) केलेल्या अर्जानुसार इमारत अभिहस्तांतरण करण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले.

श्री. अरुण भोयर यांनी कन्नमवार नगर विक्रोळी येथील अरुण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून देखभाल खर्च देऊन देखील चुकीने व्याजासह दंड आकारणी करीत लेखापरीक्षणात त्याची नोंद घेण्याबाबत अर्ज केला. या प्रकरणी श्री. जयस्वाल यांनी संबंधित उपनिबंधक यांना कुठलीही सुनावणी न घेता केवळ श्री. भोयर यांच्या प्रकरणाबाबत संबंधित गृहनिर्माण संस्थेचे लेखापरीक्षण करून घ्यावे, असे निर्देश दिले.

आज झालेल्या लोकशाही दिनात एकूण ०७ अर्ज प्राप्त झाले. म्हाडातर्फे आतापर्यंत झालेल्या ०८ लोकशाही दिनात ८१ प्राप्त अर्जांपैकी ७५ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

D:\Documents\Press Release\9th Lokshahi Din final.docx

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

Outward No. : 572/16 Dt. February 10, 2025

## Press Release

### Action-oriented Leadership: MHADA VP & CEO, Mr. Sanjeev Jaiswal, IAS, resolves five cases in record time at MHADA Lokshahi Din

Efficient governance in action: MHADA Lokshahi Din delivers swift Justice without delays

Mumbai, February 10, 2025: The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) conducted its ninth Lokshahi Din, where Vice President & CEO Mr. Sanjeev Jaiswal, IAS, promptly resolved five long-pending cases by issuing immediate directives to the concerned officials. With swift decision-making, all five matters were settled on the same day, providing instant relief to the applicants.

Applicants present at MHADA's Bandra (East) headquarters expressed satisfaction and gratitude towards Mr. Sanjeev Jaiswal and the MHADA administration for resolving their grievances without delay.

During the hearing, Mr. Amrut Kore's case, pending since 2004, was resolved immediately. He had applied for the regularization of his MHADA flat in Kandivali (West). Mr. Jaiswal directed the Estate Manager to ensure the flat transfer was completed by 3:00 PM on the same day. The officer complied, and Mr. Kore received his regularization letter on the spot, bringing an end to his long-standing issue.

Another case involved Mr. Fitzgerald Ozario, who had applied for the transfer of a redeveloped MHADA flat in Mumbai Central, previously owned by his late mother. The process had stalled due to the lack of an inheritance certificate after the passing of one of his siblings. Recognizing the urgency of the matter, Mr. Jaiswal directed officials to accept an indemnity bond in place of the certificate and ordered the immediate transfer of the property in Mr. Ozario's name. The transfer confirmation letter was issued the same day, resolving the issue that had remained pending for years.

In another dispute, Mr. Mohammad Khan, a winner of the 20% inclusive housing scheme under the Konkan Board's lottery, was charged an excessive processing fee for parking and clubhouse facilities, despite not opting for these amenities. Mr. Jaiswal personally

intervened, contacting the developer directly via phone and instructing an immediate reduction of the additional charges. This provided significant relief to the applicant.

Similarly, Mr. Anil Prabhulkar's case, related to a flat in Bhaghyodaya Cooperative Housing Society (Kandivali West), was promptly addressed. Despite receiving the property through a gift deed from his brother in 2016, it had not been regularized due to non-registration. Mr. Jaiswal instructed officials to regularize the flat immediately, and the applicant was handed the official confirmation letter on the same day, successfully closing the matter.

Another key case involved Mr. Dilip Suryavanshi, a resident of New D.N. Nagar, Shivneri Cooperative Housing Society, who was awaiting possession of his redeveloped flat. Mr. Jaiswal directed the sub-registrar to issue an immediate order for possession and appoint an authorized officer to oversee the process. Following the directive, Mr. Sanjay Walunj was appointed as the authorized officer and instructed to complete the required action within seven days and submit a report.

Apart from these key cases, other applicants also received positive resolutions. Mr. Deepak Rane, representing a redeveloped building in MHADA Colony, New Chikhalwadi, sought MHADA's maintenance responsibility for the structure. Mr. Jaiswal instructed officials to proceed with the handover formalities as per the housing society's request.

Additionally, Mr. Arun Bhoyar of Kannamwar Nagar, Vikhroli, had been incorrectly penalized with interest and late fees despite paying the required maintenance charges. Mr. Jaiswal instructed the sub-registrar to conduct an audit without requiring any further hearings.

A total of seven applications were received during today's Lokshahi Din, bringing the cumulative total to 81 applications across nine such hearings. Of these, 75 cases have already been resolved, reaffirming MHADA's commitment to transparent, efficient, and citizen-friendly governance.

Vaishali Gadpale
Chief Public Relations Officer, MHADA


MHADA

